दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)




पुणे || वर्ष ५ वे || अंक २४३ || रविवार २४ ऑगस्ट २०२५ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## व्हीजेएनटी समितीकडून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अभिनंदनाचा ठराव

सोलापूर महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या तीन दिवसीय दौऱ्यात जिल्हा प्रशासनाच्या कार्याची विशेष दखल घेण्यात आली.

समिती प्रमुख आमदार सुहास कांदे व सर्व सदस्यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून सोलापूर जिल्ह्यात व्ही जे एन टी समाजासाठी आयोजित करण्यात आलेल्या २५ विशेष शिबिरांमधून वंचित नागरिकांना विविध मूलभूत सेवा उपलब्ध करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा यशस्वी प्रयत्न केल्या बद्दल त्यांचे अभिनंदन व कौतुकाचा ठराव मांडला व तो सर्वांनी एकमताने मंजूर केला



या शिबिरांद्वारे विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील नागरिकांना १६०९ मतदान ओळखपत्रे, १४२१ जात प्रमाणपत्रे, ५१७ आधार कार्ड, १९ दिव्यांग प्रमाणपत्रे, तसेच ९१४ आयुष्यमान भारत कार्ड वितरित करण्यात आले. विशेष म्हणजे, ६२ लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत जमीन वाटप करण्यात आली, ज्यामुळे या समाजघटकांना स्थैर्य व सन्मान प्राप्त झाला.

समितीने या उपक्रमाचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले असून, हा उपक्रम संपूर्ण राज्यात पथदर्शक प्रकल्प म्हणून राबविण्याची शिफारस करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी व्हीजीएनटी समाजासाठी घेतलेल्या पुढाकाराचे समितीने विशेष कौतुक केले असून, राज्यस्तरीय धोरणनिर्मितीत या अनुभवाचा उपयोग केला जाणार आहे.

## सोलापूर महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या तीन दिवसीय दौऱ्यात जिल्हा प्रशासनाच्या कार्याची विशेष दखल घेण्यात आली.

समिती प्रमुख आमदार सुहास कांदे व सर्व सदस्यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून सोलापूर जिल्ह्यात व्ही जे एन टी समाजासाठी आयोजित करण्यात आलेल्या २५ विशेष शिबिरांमधून वंचित नागरिकांना विविध मूलभूत सेवा उपलब्ध करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा यशस्वी प्रयत्न केल्या बद्दल त्यांचे अभिनंदन व कौतुकाचा ठराव मांडला व तो सर्वांनी एकमताने मंजूर केला

या शिबिरांद्वारे विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील नागरिकांना १६०९ मतदान ओळखपत्रे, १४२१ जात प्रमाणपत्रे, ५१७ आधार कार्ड, १९ दिव्यांग प्रमाणपत्रे, तसेच ९१४ आयुष्यमान भारत कार्ड वितरित करण्यात आले. विशेष म्हणजे, ६२ लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत जमीन वाटप करण्यात आली, ज्यामुळे या समाजघटकांना स्थैर्य व सन्मान प्राप्त झाला.

समितीने या उपक्रमाचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले असून, हा उपक्रम संपूर्ण राज्यात पथदर्शक प्रकल्प म्हणून राबविण्याची शिफारस करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी व्हीजीएनटी समाजासाठी घेतलेल्या पुढाकाराचे समितीने विशेष कौतुक केले असून, राज्यस्तरीय धोरणनिर्मितीत या अनुभवाचा उपयोग केला जाणार आहे.

## ५ लाख ९१ हजार रुपयांचे हरवलेले ५० मोबाईल फोन मुळ मालकाच्या ताब्यात दिले बंडगार्डन पोलीस स्टेशन, सायबर पथकाची कामगिरी

बंडगार्डन पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पथकाचे अधिकारी श्री. स्वप्नील लोहार, पोलीस अंमलदार निलेश पालवे, प्रविण पाडाळे यांनी बंडगार्डन पोलीस ठाणे हद्दीत हरवलेल्या मोबाईल फोनचा डेटा तयार करुन त्याबाबत तांत्रीक तपास करुन /पाठपुरावा करुन नागरिकांचे हरवलेले ५ लाख ९१ हजार रुपये किंमतीचे एकुण ५० मोबाईल फोन हस्तगत करण्यात यश मिळाले आहे. हस्तगत करण्यात आलेले मोबाईल फोन संबंधीत तक्रारदार यांना बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे परीमंडळ ०२ चे पोलीस उप-आयुक्त श्री. मिलींद मोहिते सो यांचे हस्ते परत करण्यात आले. सदरचे मोबाईल फोन परत मिळाल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त करुन पोलीसांचे आभार व्यक्त केले आहे.



सदरची कामगिरी मा. अमितेश कुमार, पोलीस आयुक्त सो, पुणे शहर, मा. रंजनकुमार शर्मा सो, पोलीस सह. आयुक्त, मा. राजेंद्र बनसोडे सतो, अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, मा. श्री. मिलिंद मोहिते, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २. मा. श्रीमती संगिता शिंदे आल्फोन्सो, सहाय्यक पोलीस आयुक्त लष्कर विभाग, मा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक रविंद्र गायकवाड, मा. पोलीस निरिक्षक (गुन्हे) निलकंठ जगताप मा. पोलीस निरिक्षक (गुन्हे) संपतराव राऊत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरिक्षक स्वप्नील लोहार, निलेश पालवे, शशिकांत खाडे, महेश साळुंखे, प्रविण पाडाळे, महेश जाधव, यांचे पथकाने केली आहे.

## मुंबईत शॉर्टसर्किटचे प्रमाण वाढले : अडीच महिन्यांत १,४५० पेक्षा जास्त घटना

मुंबई : पावसाळ्यात मुंबईत



शॉर्टसर्किटच्या घटना नवीन नाहीत. मात्र, गेल्या अडीच महिन्यांत तब्बल १,४५० पेक्षा जास्त घटना घडल्या आहेत. यात सर्वाधिक उपनगरांत ८६० पेक्षा जास्त घटनांचा समावेश आहे. यामुळे हा चिंतेचा विषय झाला असून अग्निशमन दलानेही यावर उपाययोजनांची गरज व्यक्त केली आहे. दरम्यान, बेस्टच्या विद्युत विभागाकडूनही याची दखल घेतली असून पावसाळ्यानंतर तातडीने केबल बदलण्यासह अन्य कामे हाती घेण्यात येणार आहेत.

शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे मोठी जीवित व वित्तहानी होऊ शकते. त्यामुळे शॉर्टसर्किटच्या घटना रोखणे आवश्यक आहे. मीटर बॉक्समधील जुन्या केबल बदलून त्या ठिकाणी नवीन केबल टाकणे आवश्यक आहे. हे करत असताना मीटर बॉक्स केबिनकडून घरोघरी अर्थिंग गेली आहे की नाही, याचीही शहानिशा होणे आवश्यक असल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.जुन्या चाळींच्या विद्युत केबल योग्य रीतीने आहेत की नाही, याचा बेस्टच्या विद्युत विभागाच्या सहकार्याने शोध घेण्यात येणार आहे. जेथे दोष आढळून येईल तेथे तातडीने केबल बदलण्यासह अन्य कामे करण्यात येणार आहेत. पावसाळ्यानंतर हा सर्व्हे करून त्याचा अहवाल तयार करण्यात येणार आहे.

दरम्यान पावसाळ्यात ठिकठिकाणी होणा-या शॉर्टसर्किटकडे स्थानिक नागरिकांनी विशेष लक्ष द्यावे व शॉर्टसर्किट झाल्यास तातडीने त्याची माहिती १९१६ या हेल्पलाईनवर आपत्कालीन कक्षाला कळविण्यात यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## राज्यात रस्ते अपघातात वाढ; तीन महिन्यांत ९,३८५ अपघातांत १८०० लोकांचा मृत्यू

मुंबई : राज्यात रस्ते अपघातात वाढ होत असून जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत राज्यातील विविध महामार्गांवर ९,३८५ अपघाताच्या घटना घडल्या आहेत. या अपघातात १,८५६ लोकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे रस्ते अपघात



टाळण्यासाठी डेंजर स्पॉटचा शोध घेणे, रस्ते सुरक्षेसाठी उपाययोजनांची अंमलबजावणी होते की, नाही यावर लक्ष ठेवणे अशा विविध उपाययोजना सुचवण्यासाठी रस्ते सुरक्षा समितीची स्थापना करण्यात आली आहे. मात्र एप्रिल २०२३ नंतर रस्ते सुरक्षा समितीची बैठक झाली नसल्याने समितीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राज्यातील वाहतूककोंडी फोडण्यासह लोकांचा प्रवास जलदगतीने व्हावा यासाठी महामार्ग बांधले जात आहेत. समृद्धी महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई-नागपूर एक्स्प्रेस हायवे असे एकूण १८ हजार किलोमीटर लांबीचे महामार्ग आहेत. महामार्ग बांधल्याने वेळ व पैशांची बचत होते. मात्र महामार्गाचे काम होत असताना रस्ते अपघात कसे टाळता येतील, याकडे विशेष लक्ष देण्यात आलेले नाही. त्यामुळे रस्ते अपघातात दिवसेंदिवस वाढ होत आहे. रस्ते अपघात रोखण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. मात्र काही अपघात हे वाहनचालकांच्या निष्काळजीपणामुळे होत असतात, असे निदर्शनास आल्याचे वाहतूक विभागाकडून सांगण्यात आले.

रस्ते सुरक्षा समितीला बैठकीचा मुहूर्त मिळेनाअपघात टाळण्यासाठी, उपाययोजना सुचवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मे २०१५ मध्ये रस्ते सुरक्षा समिती स्थापन केली आहे. या समितीचे प्रमुख परिवहन मंत्री असतात. ही समिती रस्ते अपघातावर नियंत्रण मिळवणे, अपघात टाळण्यासाठी काय उपाययोजना करणे उपयुक्त ठरेल अशा विविध सूचना करते. मात्र राज्यात रस्ते अपघातांच्या संख्येत वाढ होत असून मृत्यूचेही प्रमाण वाढले आहे. मात्र या समितीची एप्रिल २०२३ नंतर बैठक झालेली नाही. त्यामुळे समितीच्या कामकाजावरच प्रश्न निर्माण करण्यात येत आहे.

दरम्यान, रस्ते सुरक्षा समितीचे चेअरमन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना मोबाईलवर संपर्क साधला असता ते उपलब्ध झाले नाहीत.

संपादकीय

## लोकशाहीचे आखाडे

सुमारे पाच आठवडे चाललेलं संसदेचं अधिवेशन परवा संस्थगित झालं. दिनदर्शिकेनुसार दिवस मोजले, तर ते साधारण पाच आठवडे होतात. पण, संसदेच्या काय किंवा विधिमंडळाच्या काय, कुठल्याच अधिवेशनाचा तो खरा कालावधी नसतो. प्रत्येक आठवड्यात अधिवेशनाला शनिवारी-रविवारी साप्ताहिक सुट्टी असतेच. शिवाय, अधिवेशनाच्या नियोजित कालावधी अंतर्गत येणाऱ्या नैमित्तिक सुट्ट्याही असतातच. त्यामुळे, 'अमुक एक आठवड्याचं अधिवेशन' म्हटलं, तरी प्रत्यक्षात कामकाजाचे दिवसच मोजायचे असतात. त्यात पुन्हा सभागृहात वातावरण तापलं, की होणारी तात्पुरती, वारंवार किंवा दिवसभरासाठी तहकुबी असतेच. तोही काळ अधिवेशनाच्या नियोजित कालावधीतून वजा करावा लागतो. त्यामुळे, कोणतंही अधिवेशन 'किती कालावधीचं?' याचं उत्तर नेहमी दिवसांच्या हिशेबातच दिलं जात असलं, तरी 'अधिवेशन, म्हणजे कामकाज नेमकं किती काळ चाललं!' याचं उत्तर हल्ली तासांच्या हिशेबातच द्यावं लागतं. त्याअर्थाने नुकत्याच संपलेल्या अधिवेशनात राज्यसभेचं कामकाज एकूण ४१ तास, तर लोकसभेचं केवळ ३७ तास चाललं. हे आकडे फारच कमी दिसतात म्हणून की काय, पण अधिवेशनाची गोळाबेरीज सांगताना दोन्ही सभागृहांच्या कामकाजाच्या कालावधीची बेरीज करून 'अधिवेशनाचं कामकाज ७८ तास चाललं' असं सांगितलं गेलं आहे. टक्केवारी पाहायला गेलो, तर नियोजित कामकाजापेक्षा लोकसभेत फक्त ३१ टक्के आणि राज्यसभेत ३९ टक्केच कामकाज होऊ शकलं आहे! अधिवेशनाचं कामकाज ठरवताना सरकारने जी विषयपत्रिका ठरवली होती, जी विधेयकं मांडण्याचं ठरवलं होतं, अन्य सरकारी कामकाज ठरवलं होतं, त्यातलं बहुशः झालं. पण, त्यात लोकप्रतिनिधींचा सहभाग किती होता? असा प्रश्न विचारला, तर त्याचं उत्तर मात्र अत्यंत निराशाजनक आहे.संसदेच्या अधिवेशनासाठी सरकारी तिजोरीतून; म्हणजेच जनतेच्या खिशातून दर मिनिटासाठी अडीच लाख रुपये खर्च केला जातो. हा खर्च किती प्रमाणात आणि कशासाठी वाया जातो आहे, हे पाहिलं की लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराला कशाचं रूप आलं आहे? असा प्रश्न आल्याशिवाय राहत नाही. अधिवेशनाचं कामकाज वेळेच्या दृष्टीने फारसं समाधानकारक झालं नसलं, तरी विषय आणि घडामोडी पाहता अधिवेशनाने सामान्य जनतेचं लक्ष खिळवून ठेवलं होतं, हे नक्की. 'ऑपरेशन सिंदूर'वरची चर्चा अधिवेशनाच्या अगदी सुरुवातीलाच ठेवून सरकारने बाजी मारली होतीच. या चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः लोकसभेत उत्तर देणार हे निश्चित झाल्याने चर्चेचा परिणाम जनतेत सकारात्मकच जाणार हे सुनिश्चित होतं. झालंही तसंच. लोकसभेत ७३, तर राज्यसभेत ६५ सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना मोदी आणि राज्यसभेत अमित शहा यांनी इतकं समर्पक आणि प्रभावी उत्तर दिलं, की त्यामुळे विरोधकांना आपलं अस्तित्व दाखवण्यासाठी अन्य हत्यार उपसावं लागणार हे पहिल्या आठवड्यातच स्पष्ट झालं होतं. राहुल गांधी यांचा 'मतचोरी'चा मुद्दा सभागृह आणि सभागृहाबाहेर त्यामुळेच विरोधकांनी अखेरपर्यंत धरून ठेवला. बिहारची निवडणूक आता हातातोंडाशी आली आहे. हिंदी पट्ट्यातलं हे महत्त्वाचं राज्य त्यामुळे सध्या सत्ताधारी आणि विरोधकांची रणभूमी आहे. तिथल्या मतदार याद्यांचा मुद्दा घेऊन; त्याला महाराष्ट्रासह अन्य राज्यातील आरोपांची जुनीच फोडणी देऊन विरोधकांनी संपूर्ण अधिवेशनात हंगामा केला. त्याचं टोक अधिवेशनाच्या शेवटच्या दोन दिवसांत गाठलं गेलं. शाह लोकसभेत जेव्हां 'संविधान (१३०वी) दुरुस्ती विधेयक २०२५', 'संघराज्य शासन (दुरुस्ती) विधेयक २०२५' आणि 'जम्मू-काश्मीर पुनर्रचना (दुरुस्ती) विधेयक २०२५' ही तीन अत्यंत महत्त्वाची विधेयकं मांडत होते, तेव्हां विरोधी बाकांवरून त्यांच्या दिशेने विधेयकाच्या मसुद्यांचे फाडलेले कागद आणि बोळे भिरकावले जात होते! यातून विरोधकांच्या हाती काय लागलं? पूर्वनियोजनानुसार सरकारने ही तीनही विधेयकं संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव मांडला आणि गोंधळातच मंजूरही केला. म्हणजे, ज्यांनी या विधेयकावर संसदेत सहभाग नोंदवण्याचं टाळलं त्यांना आता संयुक्त चिकित्सा समितीत भाग घ्यावाच लागेल. त्यांचा सहभाग नोंदवून तिथून आलेलं विधेयक सभागृहात मंजूर केलं जाईल.

तेव्हा विरोधकांकडे दुसरा कोणताही प्रत्यवाय नसेल!

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा अवचित राजीनामा ही या अधिवेशनातील सरकारच्या कौशल्याची आणखी एक घटना ठरली. धनखड यांनी राजीनामा दिला नाही; तो द्यावा लागला, हे आता जगजाहीर झालं आहे. पण, तो का द्यावा लागला? याविषयी अद्यापही कोणी ठोस सांगू शकत नाही. 'दिल्ली'तून जे सांगितलं जातं आहे, त्या शक्यताच आहेत.

# तळा बसस्थानकातून एसटी सेवा सुरू झाल्याने प्रवाशी वर्गात आनंदी आनंद!

तळा सुर्यादय विषेश
प्रतिनिधी कृष्णा भोसले

तळा बसस्थानकाचे काम बरेच दिवस चालू होते त्यामुळेङ्गसगळ्या एसटी बसेस या मादांड रोड कडे खाली थांबून तिथूनच चालू होत्या यामुळे प्रवासी नागरिकांना फार मोठाङ्गत्रास सहन करावा लागत होता. परंतु आजच या बसस्थानकाचे क्रांक्रिटीकरणाचे काम होऊन ते गाड्या चालविण्यासाठी मोकळे करण्यात आले त्यामुळे सर्व प्रवासी नागरिकांमध्ये आनंद होत आहे.ङ्ग पाऊस पाणी अन मादांड रोडवरून खालुन वर येणे, व एस टी साठी खाली जाणे हा त्रास वाचला आणि ऐनसणासुदीत बससेवा बसस्थानकात सुरू झाली त्यामुळेङ्गएसटी चालक वाहक, आबालवृद्ध, अपंग, वयोवस्कर यानांङ्गखुप आनंद झाला आहे.




यामुळे गणती गौरी सणाला येणाऱ्या कोकणवासीयांना खुप सोप झाले आहे.ङ्ग परंतु या शहरात पार्किंग व्यवस्था नसल्याने ऐन मोक्याच्या ठिकाणी दुकानासमोर गाड्या लावणे, रस्तावरङ्गदुकाने, छोट्या मोठ्या विक्री करणाऱ्या दुकानदार अशा मुळे वाहतूक कोंडी होते अशातच गाड्याची रहदारी यामुळेङ्गअपघाताची शक्यता, गाड्या चालवताना होणारा धोकाङ्गलक्षात घेता पोलीस प्रशासनाने या गोष्टीचा विचार कराङ्ग या बाबींवर नियंत्रण ठेवावे असे बोलले जात आहे.ङ्ग तरी सणासुदीच्या काळात नागरीकांनी सुद्धा आपले कर्तव्य पार पाडून सणासुदीचा आनंद चांगल्या प्रकारे लुटावा आणि शहरात शांतता राखण्यासाठी आपले योगदान दयावे हे आपले कर्तव्य आहे. असे जाणकार मंडळी कडून म्हटले जात आहे.

# स्वराज्य ग्रा. बि. शेती सह. पतसंस्थेत साधारण चार कोटीचा अपहार दोन आरोपी अटकेत : ५७६ ठेवीदारांची झाली फसवणूक

उ रा जि प्रतिनिधी
नारायण म्हात्रे

पेण तालुक्यातील शेतजुई येथील स्वराज्य ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत २८ मार्च २०१२ ते ०८ डिसेंबर २०२२ या काळात ०३ कोटी ८३ लाख ५१ हजार २६१ रूपयांचा अपहार झाल्याची तक्रार लेखा परीक्षक,श्रेणी ०२ सहकारी संस्था, कर्जत- रायगड यांनी २२ ऑगस्ट २०२५ रोजी नागोठणे पोलिस ठाण्यात केली असून संबंधित दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.ङ्गङ्ग सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार,शेतजुई येथील स्वराज्य ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत आरोपी नं. ०१ संस्थेचे चेअरमन व आरोपी नं. ०२ संस्थेचे सचिव यांनी आपल्या २८ मार्च २०१२ ते ०८ डिसेंबर २०२२ या काळात कार्यरत असताना संगनमत करून पतसंस्थेचे ठेवीदार यांचा विश्वास संपादन करून त्यांनी पतसंस्थेत ठेवी स्वरुपात ठेवलेली ०३ कोटी ८३ लाख ५१ हजार २६१ रुपये प्राप्त केले.

व त्या रक्कमेचा योग्य तो हिशोब ठेवणे अपेक्षित असतानाही ठेवीदारांना ठेवी परत न देता पतसंस्थेमधील डे बुक, सब डे बुक व कॅश बुकामध्ये खोटा हिशोब ठेऊन शेतजुई येथील ५७६ ठेवीदारांच्या ठेवीचा अपहार करून त्यांची फसवणूक करण्यात आली आहे. सदरील अपहाराची तक्रार २२ ऑगस्ट २०२५ रोजी अंकुश केळू शिंदे,लेखा परीक्षक, श्रेणी ०२ सहकारी संस्था, कर्जत- रायगड यांनी नागोठणे पोलिस ठाण्यात केली असून गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

संबंधित प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून सदरील गुन्ह्याचा पुढील तपास रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पो. नि. सचिन कुलकर्णी करीत आहेत.ङ्ग आरोपींना चार दिवसांची पोलिस कोठडी सदरील गुन्ह्यातील आरोपींना अलिबाग येथील विशेष न्यायालयात हजर केले असता त्यांना २६ ऑगस्ट पर्यंतची चार दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

# असोंडशिवनारी ग्रुप ग्रामपंचायतीत आदिशक्ती समिती अध्यक्षपदी मनिषा करमरकर तर तंटामुक्त समिती अध्यक्षपदी दिलीप बुरबाडकर यांची सर्वानुमते निवड

दापोली /शिवनारी :महिला सक्षमीकरण आणि ग्रामशांतता यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार असोंडशिवनारी ग्रुप ग्रामपंचायतीची विशेष ग्रामसभा नुकतीच पार पडली. या ग्रामसभेत 'आदिशक्ती समिती' तसेच 'तंटामुक्ती समिती'ची नव्याने स्थापना करण्यात आली.

या समित्यांच्या अध्यक्षपदी अनुक्रमे माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य मनिषा करमरकर (आदिशक्ती समिती) आणि दिलीप बुरबाडकर (तंटामुक्ती समिती) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. उपस्थित ग्रामस्थ, महिला मंडळाचे प्रतिनिधी, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पोलिस पाटील, गाव व वाडी अध्यक्ष आदींनी या निर्णयाचे उत्स्फूर्त स्वागत केले.





ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी राजाराम रसाळ होते. त्यांनी सर्वानुमते झालेल्या निवडीची घोषणा करताना सांगितले की, ''आदिशक्ती समितीमार्फत महिलांच्या शिक्षण, आरोग्य, सामाजिक सहभाग आणि नेतृत्व विकासाला ग्रामपातळीवर नवे बळ मिळेल. मनिषा करमरकर यांच्या अनुभवामुळे ही समिती प्रभावी कामगिरी करेल, असा विश्वास आहे.'

तंटामुक्ती समितीबाबत माजी अध्यक्ष रुपेश मुरबाडकर यांनी आपल्या कार्यकाळाचा आढावा मांडत नूतन अध्यक्ष दिलीप बुरबाडकर यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी ग्रामस्थांनी भावना व्यक्त करताना म्हटले की, ''गावातील तंटे आपसी सामंजस्याने मिटविण्यासाठी तंटामुक्ती समिती ही महत्त्वाची यंत्रणा आहे. बुरबाडकर यांच्या नेतृत्वाखाली सौहार्द, शांतता आणि ऐक्य वृद्धिंगत होईल.'' या ग्रामसभेत घेतलेल्या एकमताने निर्णयामुळे गावकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, दोन्ही समित्यांच्या माध्यमातून महिलांच्या सबलीकरणाला बळकटी मिळून गावातील तंटे मिटवून विकासाला नवे दिशादर्शन मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# एमकेसीएलच्या स्थापना दिनाचे औदित्य साधून सुयश कॉम्प्युटर सेंटर आबलोली येथे विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न

आबलोली (संदेश कदम)

महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड एमकेसीएल गेली २४ वर्ष महाराष्ट्रातील कोट्यावधी विद्यार्थ्यांपर्यंत आधुनिक डिजिटल शिक्षण व कौशल्य विकास पोचवण्याचे कार्य सातत्याने करत आहे

समाजातील डिजिटल दरी दूर करण्याच्या कार्यात उल्लेखनीय संपादन केलेले आहे

एमकेसीएलने आपल्या स्थापनेची २४ वर्ष यशस्वीरित्या पूर्ण केली असून एमकेसीएलच्या २५ व्या स्थापना दिनाची औचित्य साधून गुहागर तालुक्यातील आबलोली येथील सुयश कॉम्प्युटर सेंटर आबलोली येथे विशेष कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल) रौप्य महोत्सव स्थापना दिनानिमित्त पुणे येथे विशेष कार्यक्रमाचे लाईव्ह वेबकास्टचे आयोजन करण्यात आले होते हा कार्यक्रम पुणे येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा झाला या कार्यक्रमाला एमकेसीएलचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, प्रमुख पाहुणे महाराज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, चंद्रकांत पाटील दिलीप वळसे पाटील, आशिष शेलार, महासंगणक तज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर आधी उपस्थित होते.

त्यांचे विचार थेट प्रक्षेपणाद्वारे सुयश कॉम्प्युटर सेंटर आबलोली येथे विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. त्यानंतर आबलोली महसूलचे मंडळ अधिकारी आनंद काजरोळकर, महसूल अधिकारी विनोद जोशी, जिल्हा परिषद शाळा खोडदेच्या प्रीती गावडे, काजुर्लीच्या विजया मेस्त्री, सुयश कॉम्प्युटर सेंटर आबलोलीच्या संचालिका सौं. सावी साळवी आदी. मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते सुयश कॉम्प्युटर सेंटर आबलोली येथे विद्यार्थ्यांना एम एस सी आय टी कोर्स चे सर्टिफिकेट देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमाला आबलोली पंचक्रोशीतील विद्यार्थी पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुयश कॉम्प्युटर सेंटर आबलोलीच्या संचालिका सौं. सावी साळवी, साक्षी सावंत, शुभम सावंत, सिद्धी डिंगणकर त्यांनी विशेष प्रयत्न केले शेवटी सौ. सावी साळवी यांनी सर्वांचे आभार मानले.



## भजनी मंडळांना मिळणार भांडवली अनुदान

दै.सूर्योदय,मुंबई.(प्रतिनिधी) : महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडून सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना अनुदान दिलं जातं. २०२५ पासून गणेशोत्सवाला महाराष्ट्राचा राज्य महोत्सव म्हणून दर्जा देण्यात आला आहे. गणेशोत्सव या राज्य महोत्सवांतर्गत भजनी मंडळांना मिळणार भांडवली अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिलं आहे. राज्यातील १८०० भजनी मंडळांना भजन साहित्य खरेदीसाठी २५००० रुपये भांडवली अनुदान दिलं जाणार आहे.ङ्कऑनलाईन अर्ज करावा लागणारङ्कभजनी मंडळांना २५ हजार रुपयांचं अनुदान मिळवण्यासाठी https://mahaanudan.org या वेबसाईटवर अर्ज दाखल करावे लागतील. याबाबतचे ऑनलाईन अर्ज दिनांक २३ ऑगस्ट, २०२५ ते ०६ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत https:// mahaanudan.org . या वेबपोर्टलवर उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त भजनी मंडळांनी या अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.भजन साहित्य खरेदीसाठी अनुदानङ्कयावर्षीपासून प्रथमच गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आलेला आहे. यानिमित्ताने राज्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून राज्याभरातील १८०० भजनी मंडळांना भजन साहित्य खरेदीसाठी २५००० रुपये भांडवली अनुदान वितरण करण्यात येणार आहे, असा निर्णय सांस्कृतिक कार्य विभागानं घेतल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली.१४ ऑगस्टच्या शासन निर्णयानुसार राज्यातील नोंदणीकृत तसेच भजन क्षेत्रातील शिखर संस्थांनी प्रमाणित केलेल्या भजनी मंडळांना भांडवली खर्चासाठी अनुदान देण्यात येणार आहे. या संदर्भातील अटी व शर्तींचा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. यासाठी ५ कोटी रुपये इतकी तरतूद करणे, असा उल्लेख त्या शासन निर्णयात होता. अर्ज कसा करायचा? महाराष्ट्रातील ज्या भजनी मंडळांना भजनाचं साहित्य खरेदी करण्यासाठी २५ हजार रुपयांचं अनुदान मिळवायचं असेल त्यांना पहिल्यांदा https://mahaanudan.org या वेबसाईटला भेट देऊन अर्ज करावा लागेल.

अर्ज सादर करताना प्रथम नोंदणी करावी लागेल. यासाठी भजनी मंडळ कोणत्या प्रशासकीय विभागातील आहे हे निवडावं लागेल, त्यानंतर जिल्हा, तालुका निवड केल्यानंतर गाव किंवा नगर पालिका, नगर पंचायत निवड करावी लागेल. यानंतर भजनी मंडळाचं नाव, भजनी मंडळाचा पत्ता आणि मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी नोंदवावा लागेल. यानंतर लॉगीन करुन अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.

## जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्यु. कॉलेज टाळसुरे विद्यालयातील गार्गी रेवाळे व श्रीराज रेवाळे यांची चमकदार कामगिरी

दै.सूर्योदय,दापोली(प्रतिनिधी) : क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी रत्नागिरी द्वारा आयोजित रत्नागिरी जिल्हा मल्लखांब संघटना यांच्या तांत्रिक सहकार्याने जिल्हास्तरीय शालेय मल्लखांब क्रीडा स्पर्धा पाग व्यायामशाळा चिपळूण येथे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डे संचलित न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्यु. कॉलेज टाळसुरे या विद्यालयातील कु. गार्गी रेवाळे हिने १७ वर्ष वयोगटातील जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला तर श्रीराज रेवाळे याने ५वा क्रमांक प्राप्त केला. विभाग स्तरावर होणाऱ्या स्पर्धेकरिता जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी या विद्यार्थ्यांना प्राप्त झाली असून यशस्वी विद्यार्थ्यांचे सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डेचे कार्याध्यक्ष आ. शेखर निकम, सचिव महेश महाडिक, शालेय समिती अध्यक्ष जयवंत जालगावकर, सदस्य आप्पा खोत, अशोक जाधव, मुख्याध्यापक संदेश राऊत यांनी शुभेच्छा दिल्या.



# रत्नागिरी रेल्वे पोलीस ठाणे उभे राहणार

दै.सूर्योदय,मुंबई,(प्रतिनिधी): कोकण रेल्वेवरील स्थानकांची जबाबदारी रेल्वे पोलिसांवर सोपवण्यात आली आहे. त्यामुळे कोकण रेल्वेवरील प्रवाशांच्या सुरक्षेत भर पडणार आहे. येत्या काही दिवसांत कोकण रेल्वेच्या रत्नागिरी रेल्वे स्थानकात रत्नागिरी रेल्वे पोलीस ठाण्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या रेल्वे पोलीस ठाण्यात सध्या तीन ते चार पोलीस अधिकारी आणि ६० पोलीस कर्मचारी असतील.ङ्कमध्य आणि पश्चिम रेल्वेच्या प्रवाशांच्या सुरक्षेची, प्रवाशांच्या मालाची आणि रेल्वेच्या मालमत्तेची सुरक्षा करण्याची जबाबदारी रेल्वे सुरक्षा दलाकडे (आरपीएफ) आहे. तसेच, रेल्वे स्थानके, रेल्वे परिसर, उपनगरीय मार्गावरील गुन्ह्यांचा तपास, गुन्ह्यांची उकल करण्याची जबाबदारी रेल्वे पोलिसांकडे आहे. मध्य रेल्वेवरील सीएसएमटी ते पनवेल, कसारा, खोपोली आणि पश्चिम रेल्वेवरील चर्चगेट ते डहाणू रोडपर्यंतची हद्द ही मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाकडे आहे. तर, रोहानंतर कोकणातील रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची, रेल्वे परिसराच्या सुरक्षेची जबाबदारी रेल्वे सुरक्षा दल आणि स्थानिक पोलीस ठाण्याची आहे, परंतु गेल्या काही वर्षांत कोकण रेल्वे मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या प्रचंड वाढली आहे.ङ्कमोबाइल चोरी, सोनसाखळी खेचणे, मारामारी, खून अशा घटना वाढल्याने या ठिकाणी रेल्वे पोलीस ठाण्याची उभारणी करणे अत्यावश्यक होते. यासह कोकण रेल्वे प्रवासात महिलांशी संबंधित गुन्हे घडत असल्याने, तत्काळ गुन्हा नोंद करून, तपास करणे गरजेचे असते. परंतु, कोकण रेल्वे हद्दीत गुन्हा घडल्यास, त्याची तक्रार स्थानिक पोलीस ठाण्यात करावी लागत होती. त्यामुळे कोकण रेल्वेवरील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाकडे दिली आहे. याबाबत शासनाकडून मान्यता मिळाली असून, आता रत्नागिरी रेल्वे स्थानकावर लोहमार्ग पोलीस ठाणे उभारण्यात आले आहे. त्यामुळे प्रवाशांना त्वरित तक्रार करणे सोयीस्कर होईल.ङ्करत्नागिरी रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोलाड ते राजापूर रेल्वे स्थानकाचा भाग असेल. तसेच, प्रत्येक स्थानकाच्या रेल्वे परिसराचाच भाग हद्दीत समाविष्ट केला आहे. त्यानंतर कोकण रेल्वेच्या स्थानकातील दोन्ही बाजूने ४०० ते ५०० मीटरचा भाग सोडल्यास उर्वरित भाग हा स्थानिक पोलीस ठाण्याच्या हद्दीतच राहणार आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिली.ङ्कयेत्या काही दिवसांत रत्नागिरी लोहमार्ग पोलीस ठाणे कार्यान्वित केले जाईल. या पोलीस ठाण्याची हद्द ही रायगडमधील कोलाड रेल्वे स्थानक ते विन्हेरे रेल्वे स्थानक आणि रत्नागिरीमधील दिवाणखवटी रेल्वे स्थानक ते राजापूर रेल्वे स्थानकापर्यंत आहे. या ठाण्यात सुमारे १५० रेल्वे पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा ताफा कार्यरत राहणार आहे, अशी माहिती लोहमार्ग पोलीस आयुक्त एम. राकेश कलासागर यांनी दिली.

## लोकरंग

१साप्ताहिक संवाद

जीवाष्म इंधनांना पर्याय;सॅपचे इंधन

पेट्रोल,डिझेल,सीएनजी यासारख्या पारंपरिक जीवाश्म इंधनाचा नैसर्गिक साठा हा वर्षानुवर्षांच्या अतिरेकी वापरामुळे आता संपुष्टात येऊ लागलेला दिसतोय. अर्थात या पारंपरिक इंधनाला पर्याय म्हणूनच विजेवर किंवा सौरऊर्जेवर चालणारी वाहनांची आता निर्मिती होताना दिसतेय. तरी सुद्धा अशा इंधनाला आणखी उपलब्ध पर्यायाचा विचार गांभीर्याने करुण दृष्टीने प्रत्यक्ष कार्यवाही करण आता काळाची गरज बनली आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन ने याच अनुषंगाने सॅप हा वापरलेल्या घटकापासून निर्माण केल्या जाणाऱ्या हवाई इंधनाचा पर्याय शोधलेला आहे. हा पर्याय नेमका काय आहे?हे सैफ हवाई इंधन नेमके काय आहे?याच प्रश्नाची उकल करण्यासाठी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे अध्यक्ष अरविंद सहानी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

१ वापरलेल्या घटकापासून इंडियन ऑइल कॉर्पोरेशन सॅप इंधनाची निर्मिती कशी करणार आहे?

आपण स्वयंपाक केल्यानंतर वाया जाणारे तळणीचे तेल,उसाचे चिपाड,मक्याची सालपट,आदी वापरलेल्या घटकापासून बिगर पेट्रोलियम फीडस्टॉक आयओसी शाश्वत इंधनाची निर्मिती करणार आहे. हे इंधन हवाई इंधन प्रकारचे असून याचा पुरवठा इंडियन ऑइल एअर इंडियाला करणार आहे.यासाठी दोन्ही कंपन्यांमध्ये महत्वाचा करार देखील संपन्न झालेला आहे. आयओसी यावर्षीच्या डिसेंबर महिन्यापासून आपल्या पानिपत रिफायनरी मध्ये वापरलेल्या स्वयंपाकाच्या तेलापासून सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल ची निर्मिती सुरु करणार असून यासाठी आयटीसी आणि हल्दीराम यासारख्या हॉटेल रेस्टोरा साखळीतून मिळणाऱ्या वापरलेल्या तेलापासून २५ हजार टन ग्रीन इंधन तयार केले जाणार आहे.

२इंडियन ऑइल कॉर्पोरेशन आणि एअर इंडिया या कंपन्यांमध्ये या हवाई इंधनसंदर्भात कोणता करार झालेला आहे?

इंडियन ऑइल कोर्पोरेशन चे अध्यक्ष अरविंद सहानी आणि एअर इंडियाचे सीईओ कंपेबल विल्सन यांच्या उपस्थितीत हा करार संपन्न झालेला आहे. या करारानुसार विमान वाहतुकीत कमी कार्बन इंधनाचा वापर वाढविणे,जागतिक कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या उद्दिष्टाना पाठिंबा देणे आणि अधिक टिकाऊ हवाई वाहतूक इंधन कार्यान्वयीत करण्यासाठी संक्रमण करण्यास योगदान देण्याबाबत दोन्ही पक्षांची सामाइक बांधिलकी याबद्दल सामंजस्य करण्यात आले. पानिपत रिफायनरी यामध्ये सॅप उत्पादनासाठी आयएससीसी कोर्सिया प्रमाणपत्र मिळवणारी आयओसी हि पहिली भारतीय कंपनी ठरली आहे.

३ सॅप नेमके काय असणार आहे?

सॅप हे बिगर पेट्रोलियम फीडस्टोक पसरून बनवलेले एक पर्यायी हवाई इंधन आहे. हे इंधन हवाई वाहतुकीत कार्बनचे होणारे मोठ्या प्रमाणातील उत्सर्जन कमी करण्यास महत्वाचे ठरणार आहे. उपलब्धतेनुसार हे पारंपरिक एव्हिएशन टर्बाईन फ्युएल ईटीएफ किंवा जेट फ्युएल मध्ये ५० टक्क्यापर्यंत मिसळता येणार आहे. देशात २०२७ पासून आतंरराष्ट्रीय विमान कंपन्यांना विकल्या जाणाऱ्या जेट फ्युएल यामध्ये १ टक्के सॅप मिश्रण अनिवार्य करण्यात आले आहे.

२ नोंद


मुथूट एक्झिमचे छत्रपती संभाजीनगर मध्ये नवे गोल्ड पॉइंट सेंटर

१३८ वर्ष जुन्या व्यवसाय समूह मुथूट पप्पाचन ग्रुपची (मुथूट ब्लू म्हणूनही ओळखली जाते) मौल्यवान धातूची शाखा म्हणजेच मुथूट एक्झिम प्रायव्हेट लिमिटेडला छत्रपती संभाजीनगर मध्ये आपल्या नवीन गोल्ड पॉइंट सेंटरच्या भव्य उद्घाटनाची घोषणा करताना अभिमान वाटत आहे. नवीन मुथूट गोल्ड पॉइंट सेंटर हे दुकान क्र. ३, कुबेर एव्हेन्यू बी, हॉटेल अतिथी समोर, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र येथे मोक्याच्या ठिकाणी आहे. मुथूट एक्झिमचे हे भारतातील ५८ वे गोल्ड पॉइंट सेंटर आहे आणि फिरत्या गाडीसह महाराष्ट्रातील हे सहावे केंद्र आहे. महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे या गोल्ड पॉइंट सेंटरचे उद्घाटन केल्याने स्थानिक लोकांच्या आर्थिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणेल. यामुळे त्यांना त्यांच्या सोन्याच्या वस्तू विकण्याची सुविधा तर मिळेलच, याशिवाय या विश्वासार्ह व पारदर्शक केंद्राद्वारे वित्तीय सेवा अधिक सुलभ होतील. मुथूट एक्झिमचे गोल्ड पॉइंट सेंटर पारदर्शकता, ग्राहकांचा विश्वास जपणे, बांधिलकी आणि त्यांच्या वचनबद्धतेसाठी प्रसिद्ध आहेत. या केंद्रांवर, ग्राहक त्यांच्या जुन्या आणि वापरलेल्या सोन्याच्या वस्तू वाजवी आणि अचूक मूल्यमापनाच्या आश्वासनासह विकू शकतात. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडली जाते, ज्यामुळे ग्राहकांना प्रत्यक्ष मूल्यांकन पाहता येते. , किंवा सारख्या सुविधांच्या माध्यमातून मोठ्या रकमेचे पेमेंट केले जाते, तर १०,००० रुपयांपर्यंतच्या सोन्यासाठी झटपट रोख पेमेंट केले जाते, ज्यामुळे अखंडित आणि विश्वासार्ह व्यवहाराचा अनुभव मिळतो.मुथूट एक्झिम प्रायव्हेट लिमिटेड (एमईपीएल) मौल्यवान धातूंच्या बाजारपेठेत नाविन्यपूर्णता आणण्याच्या बाबतीत आघाडीवर आहे. भारतात सोन्याचे पुनर्वापर केंद्र सुरू करणारी पहिली संघटित कंपनी म्हणून, एमईपीएलने उद्योग क्षेत्रात सातत्याने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

३ चला पर्यटनाला

हिरवंगार गुवाहाटी

आसामच्या राजधानीचं शहर म्हणजे गुवाहाटी. ब्रम्हपुत्रा नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या या शहराकडे पर्यटक आकर्षित होत असतात. घाटातून होणारी बसवाहतूक, रमणीय हिरवागार डोंगराळ परिसर, शेती व बागायती परिसर यामुळे हिवाळ्यात जाण्यासाठी हा एक वेगळा पर्याय तुमच्यासमोर असेल.भारताच्या ईशान्येकडील अति रमणीय, नैसर्गिकदृष्ट्या नटलेला आसाम पर्यटकांसाठी चांगलं आकर्षण आहे. 'आसाम' म्हणजे म्यानमार, तिबेट (चीन) भूतान, पू. बंगाल (बांगलादेश) ह्या आंतरराष्ट्रीय सीमांना भिडलेला भाग आहे. गुवाहाटी हे आसाममधलं महत्त्वाचं शहर होय. बाजूनं जाणारी ब्रह्मपुत्रा नदी, घाटातून चालणारी बसवाहतूक, रमणीय हिरवागार डोंगराळ परिसर, शेती व बागायती परिसर पर्यटकांना आकर्षित करीत असतो. ह्या भागातून तिस्ता, हुगळी, गंगा, ब्रह्मपुत्रा ह्या नद्या जातात. साहजिकच हा परिसर शेतीनं संपन्न आहे. इंडस्ट्री म्हणावी तशी नसल्यानं शांत, प्रदूषणमुक्त परिसरातून प्रवास होतो. गुवाहाटीजवळ एक मोठा प्रसिद्ध तलावही आहे, जिथे विविध प्रकारचे पक्षी पाहायला मिळतात. 'गुवाहाटी' रेल्वेस्थानक प्रशस्त असून आसपास पर्यटकांसाठी भरपूर हॉटेल्स आहेत. तेथून जवळच म्हणजे सुमारे तीन किमीवर लांब व रुंद पात्र असलेली 'ब्रह्मपुत्रा' दिसते. छोट्या बोटीने नदी काठ पार करावा लागतो. बोटीतून ब्रह्मपुत्रा पार करणं म्हणजे पर्यटकांसाठी पर्वणीच असते. ब्रह्मपुत्रा जिथे उगम पावते तेथे बेट असून काही (५० ते ६०) पायऱ्या वर चालल्यावर उमानंद महादेव शिवमंदिर आहे. पुढे नवग्रह, वशिष्ठ मंदिर २० किमीवर असून त्याची बांधणी दगडी आहे. गुवाहाटी रेल्वेस्टेशनहून सुमारे ३० किमीवर सफेद मार्बलचं बालाजी मंदिर आहे. 'कलाक्षेत्र' या सांस्कृतिक संग्रहालयात आसामची सांस्कृतिक झलक पाहायला मिळते.गुवाहाटीपासून ६० किमी 'हाजो' इथे विष्णू महादेव मंदिर असून ते चढावावर आहे. तलावात पाय धुवूनच पुढे ७०–८० पायऱ्या चढून वर जावं लागतं. मंदिर पूर्ण दगडी असून आत कृष्णाच्या पाच वेगवेगळ्या मूर्ती आहेत. ह्याला मंदिराला आसामचं खजुराहो म्हणतात.गुवाहाटीपासून जेमतेम ४० किमीवर 'सौलकुची' नावाचं महिला पर्यटकांना आकर्षित करणारं ठिकाण आहे.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क –९८३३१४६३५६**
**इमेल –**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार २४ ऑगस्ट २०२५



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## कणकवलीचे पोलीस निरीक्षक अतुल जाधव निलंबित; पालकमंत्री नितेश राणेंचे मटका अड्ड्यावरील छापा प्रकरण; पोलीस दलात खळबळ

सिंधुदुर्ग : संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेचा विषय ठरलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली येथील मटका अड्ड्यावर खुद्द पालकमंत्री नितेश राणे यांनी टाकलेल्या छाप्याचे आता पडसाद खाकी वर्दीत उमटू लागले आहेत. या घटनेनंतर अवघ्या २४ तासात कणकवली पोलीस निरीक्षक अतुल जाधव यांना कोकण परिक्षेत्राचे महानिरीक्षक यांनी निलंबित केलं आहे. या निलंबनाच्या कारवाईनंतर पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे.ङ्गङ्गपालकमंत्री नितेश राणे यांनी गुरुवारी कणकवलीतील मटका अड्ड्यावर छापा टाकला होता. ही कारवाई करण्यात आल्यानंतर पोलीस यंत्रणेत खळबळ उडाली होती. या घटनेचे साईड इफेक्ट पोलीस दलाला भोगावे लागणार हे निश्चित होते. कारण पोलीस दलाची संपूर्ण महाराष्ट्रात बदनामी झाली असून जिल्ह्यात अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे चित्र यातून दिसून येत आहे. त्यातच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अवैध धंद्यांना आळा बसावा यासाठी पालकमंत्री नितेश राणे यांनी थेट कारवाईचा बडगा उगारला. कणकवली शहरातील एका मटका अड्ड्यावर त्यांनी अचानक छापा टाकत बेकायदेशीर धंद्यांविरोधात



कठोर पावले उचलली. या छाप्यानंतर संपूर्ण शहरात मोठी खळबळ उडाली होती.ङ्गङ्गया संदर्भात शुक्रवारी सकाळीच पत्रकार परिषद घेऊन पालकमंत्री नितेश राणे यांनी स्पष्ट इशारा दिला की, जिल्ह्यातील अवैध धंद्यांना कोणतेही राजकीय किंवा प्रशासकीय पाठबळ मिळणार नाही. जे अधिकारी अशा धंद्यांना संरक्षण देतील त्यांची गय केली जाणार नाही. त्यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना आणि इतर यंत्रणांना एकप्रकारे इशाराच दिला. त्यानंतर सायंकाळी उशिरा पोलीस निरीक्षक अतुल जाधव यांचं निलंबन करण्यात आलं आहे. या घटनेतील जबाबदार पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई होणार हे कालपासूनच निश्चित झालं होतं. पण सर्वात प्रथम कोणावर कारवाई होणार हे मात्र निश्चित नव्हतं. मात्र शुक्रवारी सायंकाळी उशिरा कोकण परिक्षेत्राचे महानिरीक्षक यांनी कणकवली पोलीस निरीक्षक अतुल जाधव यांना निलंबित करत अवैध व्यवसाय प्रकरणात पहिला दणका दिला आहे. आता यानंतर पुढचा नंबर कोणाचा? अशी चर्चा सुरू झाली आहे.

## वकिल मंगेश देशमुख ग्लोबल एक्सलन्स इन लीडरशिप अवॉर्डने सन्मानित!




कर्जत : जयेश जाधव व्हिएतनाममधील आंतरराष्ट्रीय पुरस्कार फोरम (टीआयएएफ) च्या वतीने कर्जत येथील वकिल मंगेश देशमुख एक्सलन्स इन लीडरशिप पुरस्काराने नुकताच सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

याआधी देखील अ‍ॅड मंगेश देशमुख मलेशिया देशात इंडो ग्लोबल एक्सलन्स पुरस्कार तसेच बहरीन देशात झालेला २०२५ मधील २० व्या जागतिक वकील परिषदेचे मध्ये वर्ल्ड लॉयर फॉरम्? २०२५ या अ‍ॅवार्डने सन्मानित करण्यात झाला आहे त्यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे

## वाढवण पाणसई रस्ता झाला जळमय;नागरिकांचे व शाळेतील मुलांचे मोठे हाल, दळणवळण ठप्प; शासन काय करतंय नागरिकांचा प्रश्न?

माणगांव प्रतिनिधी:- संतोष मोरे

गेल्या दि.१७ ऑगस्ट २०२५ पासून सतत मुसळधार पावसामुळे इंदापूर ते वाढवण पाणसई जोडणारा मुख्य रस्ता जळमय झाला आहे. यामुळे स्थानिक नागरिक आणि शाळकरी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दळणवळण पूर्ण पणे ठप्प झाल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. तरी शासनाकडून अद्याप कोणती ही ठोस कारवाई झालेली नाही. नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

या भागात गेल्या तीन ते चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने रस्त्यावर पाणी साचले आहे. वाढवण आणि पाणसई हे दोन गावे इंदपूरला जोडणारा व निजामपूर मार्गे पुणे जाणारा सोईचा मुख्य वाहतुकीचा रस्ता असून यावरून दररोज अनेक वाहने आणि पादचारी जातात मात्र, पाणी साचल्याने रस्ता पूर्ण पणे बंद होतो. यामुळे नागरिकांना दैनंदिन कामासाठी दूरच्या मार्गाने जावे लागत असून वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहे. शाळकरी मुलांना याचा सर्वाधिक त्रास होत आहे. इंदापूर येथे माध्यमिक व कॉलेजला जाणाऱ्या मुलांना शाळेत पोहचणे कठीण झाले आहे. पाण्यातून जाणे धोक्याचे आहे असे मुलांच्या पालकांनी सांगितले आहे.

आता तरी शासन याकडे लक्ष देईल का असे पाणसई वाढवण ग्रामस्थ बोलत आहेत. की मोठा अपघात झाला की शासनाला जाग येईल. अशा संतप्त नागरिकांच्या प्रतिक्रिया आहेत.

## सुकापुर नदीच्या बाजुला बनलाय कच-याचा डंपींग ग्रांउड

पनवेल प्रतिनिधी - सुनील जाधव

नवी मुंबई पनवेल परिसरा मधे सुकापुर या ठिकाणी पालीदेवद हा विभाग नेहमी गजबजलेला असुन या ठिकाणी लोकसंख्येचा झपाट्याने वाढ होताना दिसण्यांत येत असुन नेरे-चिपळे नदी याच परिसरातुन वहात असुन या नदीच्या बाजुला सुवर्णभुमी संकुंलाच्या पाठीमागे मोठ्या प्रमाणात कच-याचा ढिग जमा झालेला दिसत आहे.हा कचरा अनेक गावांतून घटीगाड्यां मार्फत जमा होताना दिसण्यांत येतो.मात्र या कच-याचे संकलन होत नाही,वा त्याच्यावर केमीकलची फवारणी ही मारली जात नाही.या मुळे या ठिकाणी संकुला मधे रहाणा-या लोकांना सतत येणा-या दुर्गंधी वासाला सहन करावा लागत असुन पावसामुळे पावसाच्या पाण्यामुळे कचरा वाहत गेल्यामुळे रस्त्यावर ये-जा करणे अवघड होत आहे.पालीदेवद ग्रामपंचायत उगड्या डोळ्यांनी बघत असुन ठोस उपाय योजना केली जात नाही अशी येथील लोंकाची तक्रार असुन या बाबत लवकरात लवकर कार्यवाही व्हावी अशी येथील लोकांची मागणी आहे.



## प्रतिक विनायक ओक यांचा डॉक्टरेट साठी प्रबंध सादर केल्याबद्दल सत्कार संपन्न



चिपळूण प्रतिनिधी - प्रदीप पवार रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करत असलेल्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे सल्लागार विनायक ओक यांचे सुपुत्र प्रतीक यांचा सत्कार संपन्न झाला. प्रतीक ओक यांनी ''महिलांना होणाऱ्या कॅन्सरचे निदान अचूक व जलद होण्यासाठी एआयचा वापर'' अशा प्रकारचा प्रबंध सादर केला आहे. वाचनालयाच्या वार्षिक सभेच्या निमित्ताने प्रतिक ओक यांना शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी मनोगत व्यक्त करताना संस्थेला धन्यवाद दिले तसेच इंजिनिअर व मेडिकल शाखांनी एकत्रित कार्य केले तर आजाराचे अचूक निदान करणे शक्य असल्याचे सांगितले. त्यांनी दोन पेटंटसाठी प्रस्ताव सादर केला असून स्कोपस्? इंडेक्स जर्नलमध्ये दोन वेळा लिखाण केले आणि दोनवेळा इंटरनॅशनल कॉन्फरंस मध्ये सहभागी झाले आहेत. तसेच इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या स्प्रिंगर पब्लिकेशनच्या पुस्तकात एक धडा प्रकाशित झालेला आहे. त्यांचा सत्कार वाचनालयाकडून करतेवेळी वाचनालयाचे अध्यक्ष राष्ट्रपाल सावंत, कार्याध्यक्ष सुनिल खेडेकर, कार्यवाह सुमेध करमरकर यांचेसह सर्व संचालक व सभासद उपस्थित होते.

## दुकानदारांचे फुटपाथवर अतिक्रमण

पनवेल प्रतिनिधी - सुनील जाधव

नवी मुंबई पनवेल माथेरान रोड या परिसरा मधे नेहमी लोकांची सतत वर्दळ दिसुन येत असुन या ठिकाणी अगदी रांगे मधे छोटी मोठी दुकाने थाटामाटाने उभी असताना दिसत आहेत शिवाकॉम्पलॅक्स या भागामधे बहुतांशी रस्त्या लगतच्या दुकानदाराने आपल्या मनमानीने सगळीच फुटपाथ वर अतिक्रमण केलेले दिसण्यांत येत असुन पादचारी मात्र आपला जीव मुठीत घेवुन मुकाटपणे रस्त्यावर ये-जा करीत असताना पहावयास मिळत आहे.या दुकानदार मालकांवर पनवेल महानगर पालिका व पोलिस प्रशासनाचा आशिर्वाद असुन या मुळे या दुकानमालकांवर कडक कारवाई होतानां दिसण्यांत येत नाही.तरी अश्या अतिक्रमण करणार्या दुकान मालकांवर लवकरात लवकर कारवाई व्हावी अशी येथील नागरिकांची मागणी आहे.




भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )